**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राजू बाळासाहेब गोरे,
मु.पो.हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४८/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.०२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री.राजू बाळासाहेब गोरे,
मु.पो.हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.दत्ता नाना माने प्रतिनिधी श्री.शिवाजी शिंदे

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,शिरोळ,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.शिवाजी जनार्दन शिंदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.०१.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३१.०३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२०.०८.२००९ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,शिरोळ,ता.शिरोळ,जि.कोल्हापूर यांनी अपुरी माहिती दिली. प्रत्येक महिन्याला काही शिधापत्रिका व लोकसंख्या कमी-जास्त होते. त्यानुसार प्रत्येक दुकानदाराला मिळणारा रॉकेलचा साठाही कमी जास्त होतो. त्यानुसार दर महिन्याला नवीन वाटपपत्र तयार केले जाते. असा फरक नसलेली वेगवेगळया महिन्यांची वाटपपत्रे जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी अपिलाचा निर्णय विहित मुदतीत दिला नाही. माहिती देणे जाणीवपूर्वक टाळले जात आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.राजू बाळासाहेब गोरे यांनी केली.

श्री.गोरे यांनी दि.३१.१२.२००८ रोजी केलेल्या अर्जानुसार माहितीबाबतचे शुल्क दि.१७.०१.२००९ च्या पत्रान्वये कळविले. त्यांनी दि.१२.०२.२००९ रोजी कोषागारात रक्कम भरल्यानंतर त्याच दिवशी त्यांना समक्ष माहिती दिली. माहिती अपुरी व दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरुन त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,शिरोळ,ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांच्याकडे अपील दाखल केले. सुनावणीच्या पहिल्या तारखेच्या वेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या पूरग्रस्त गावांच्या अचानक दौऱ्यामुळे सुनावणी होऊ शकली नाही. त्या नंतरच्या तारखेला श्री.गोरे हजर राहिले नाहीत व या अपिलाचा निर्णय होण्याआधीच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले. माहिती अपुरी असल्याबाबतचे त्यांचे पत्र मिळाल्यानंतर दूरध्वनीवरुन वारंवार संपर्क साधला व समक्ष अभिलेखांचे अवलोकन करुन माहिती घेण्यास सांगितले. ते न आल्यामुळे कार्यालयातील दोन लिपिकांना संबंधित कागदपत्रे घेऊन श्री.गोरे यांना दाखविण्यासाठी हातकणंगले येथे पाठविले होते. श्री.गोरे यांची भेट न झाल्यामुळे दूरध्वनीवरील चर्चेत त्यांनी सांगितल्यानुसार हातकणंगले तहसील कार्यालयात माहिती ठेवून त्यांना तशी कल्पना दिली. नंतरही आठ दिवसांत त्यांनी तेथून ती माहिती न नेल्यामुळे सविस्तर खुलाशासह पूरक माहिती त्यांना टपालाने पाठविली. संपूर्ण माहिती दिली. अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन दिले व खुलासाही केला, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब

तहसीलदार,शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.शिवाजी जनार्दन शिंदे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.शिवाजी जनार्दन शिंदे यांनी योग्य कार्यवाही केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 27 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हरकचंद माणिकलाल खाबिया
१४९, मारूती आळी, शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरूर तहसील कार्यालय,
ता.शिरूर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
शिरूर तहसील कार्यालय, ता.शिरूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरूर तहसील कार्यालय,
ता.शिरूर, जि.पुणे श्री.अतुल म्हेत्रे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
शिरूर तहसील कार्यालय, ता.शिरूर, जि.पुणे श्री.ऋषिकेश शेळके

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.९.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.९.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.७.११.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | निर्णय दिला नाही. |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सरकारी जागांच्या संदर्भातील माहिती न मिळाल्याच्या कारणावरून अपीलकर्ता श्री.हरकचंद माणिकलाल खाबिया यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.खाबिया यांनी विस्तृत स्वरूपाची व अनक बाबींमध्ये मत अथवा भाष्य विचारणारी माहिती मागितली होती. त्यातील काही माहिती नगरपरिषदेशी संबंधित होती. त्यामुळे अर्ज नगरपरिषदेकडे वर्ग केला. नगरपरिषदेने ती माहिती दिली. तहसील कार्यालयाकडील माहितीबाबत अपीलकर्त्यांनी अभिलेखाचे अवलोकन करावे. त्यानुसार माहिती देण्यात येईल, असे श्री.खाबिया यांना विहित मुदतीत कळविले होते. परंतु ते आले नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरूर तहसील कार्यालय, ता.शिरूर, जि.पुणे श्री.ऋषिकेश शेळके यांनी केले. प्रथम अपिलाच्या सुनावणीला अपीलकर्ता उपस्थित नसल्यामुळे सुनावणी झाली नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरूर तहसील कार्यालय, ता.शिरूर, जि.पुणे श्री.अतुल म्हेत्रे यांनी नमूद केले. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरूर तहसील कार्यालय, ता.शिरूर, जि.पुणे श्री.ऋषिकेश शेळके व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरूर तहसील कार्यालय, ता.शिरूर, जि.पुणे श्री.अतुल म्हेत्रे यांनी योग्य कार्यवाही केली आहे. तसेच अपीलकर्त्यांनी अनेक बाबीत केलेली विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार 'माहिती' ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
27 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. संदीप रायप्पा गडदे
मु.पो.गौंडवाडी, ता. सांगोला, जि.सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, सांगोला, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत गौडगाव, ता.सांगोला, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६० / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | २७.४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,<br>पंचायत समिती, सांगोला, जि. सोलापूर श्री. एस.आर. पवार<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत गौडगाव, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री. अनिल विनायक पाडवी | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.१०.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.११.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.१२.२००९ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. संदीप रायप्पा गडदे यांनी मागितलेली माहिती आपण दिली, परंतु ती अपुरी असल्याच्या कारणावरून त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, सांगोला यांच्याकडे अपील केले. तपशीलवार माहिती विनाविलंब व नि:शुल्क देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती,सांगोला श्री. एस. आर. पवार यांनी दिले. त्यानुसार चार दिवसांत आपण माहिती दिली. आपल्या मागणीनुसार पूर्ण माहिती मिळाली असून कोणतीही अडचण व तक्रार राहिलेली नाही, असे अपीलकर्त्याने दि. ३.१२.२००९ च्या पत्रान्वये लेखी दिले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत गौडगाव, ता. सांगोला व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती,सांगोला श्री. एस. आर. पवार यांनी संबंधित पत्राच्या प्रतींसह नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अनिल ज्ञानदेव केदारी (सुतार)
मु.पो.खेड बु., ता.खंडाळा, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषी अधिकारी,
ता.वाई, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,
ता.खंडाळा, जि.सातारा — उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९२ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अनिल ज्ञानदेव केदारी (सुतार)
मु.पो.खेड बु., ता.खंडाळा, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषी अधिकारी, ता.वाई, जि.सातारा श्री.यु.जी.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी, ता.खंडाळा, जि.सातारा श्री.अ.दे.कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.३.२००८, २७.३.२००८, ४.४.२००८, ९.४.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.७.२००८, २३.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.६.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१८.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

विविध स्वरूपाची माहिती मागणारे ५ अर्ज आपण केले. एकाही अर्जाला जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, खंडाळा, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, ता.खंडाळा, जि.सातारा यांनी उत्तर दिले नाही. अपिलीय प्राधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, खंडाळा, जि.सातारा यांनी सूचना देऊनही माहिती दिली नाही. प्रथम अपील केल्यानंतर माहिती मिळाली चार अर्जांमधील माहिती देण्यास ८० दिवस व सन २००७ मधील अर्जावर माहिती देण्यास ३४४ दिवस विलंब झाला. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, खंडाळा, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, ता.खंडाळा, जि.सातारा यांना शास्ती लावावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.अनिल ज्ञानदेव केदारी (सुतार) यांनी केली.

तालुका कृषी अधिकारी कार्यालय, खंडाळा या कार्यालयातील ८० टक्के पदे रिक्त असताना, तसेच आर्थिक वर्षाअखेरीच्या कामाचा ताण असताना श्री. केदारी (सुतार) यांनी चार अर्जांद्वारे विस्तृत माहिती मागितली. पूर्वीच्या एका अर्जातही त्यांनी तशाच स्वरूपाची विस्तृत माहिती मागितली होती. उपलब्ध साधनसामग्री माहिती देण्यासाठी प्रमाणाबाहेर वळवावी लागणार असल्याचे कारण देऊन माहिती नाकारता आली असती. परंतु तसे न करता प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या दिवशी प्रतिनिधीमार्फत माहिती पाठविली असता ती स्वीकारण्यास श्री.केदारी(सुतार) यानी नकार दिला. ४९३ पानांची माहिती समक्ष स्वीकारणार असल्याचे त्यांनी सांगितले, परंतु ते न

आल्यामुळे दि.५.७.२००८ रोजी त्यांच्या पत्त्यावर रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली, असे लेखी व तोंडी निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, खंडाळा, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, ता.खंडाळा, जि.सातारा श्री.व्ही.जी.कानडे यांनी केले.

श्री.केदारी(सुतार) यांनी विस्तृत महिती मागितली होती. तसेच काही अर्जांमध्ये काही विशिष्ट नमुन्यात माहिती देण्याची मागणी केली होती. कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या, कामाचा ताण व वर्षाअखेरीची कामे या श्री.कानडे यांनी नमूद केलेल्या अडचणी रास्त आहेत. मात्र काही अर्जांना त्यांनी उत्तर दिले नाही. श्री.केदारी(सुतार) यांनी पाचही अर्जांबाबत दि.१६.५.२००८ रोजी एकत्रित अपील केले. त्यानंतर माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी श्री.कानडे यांना दि.२०.५.२००८ च्या पत्रान्वये सूचना दिल्या. त्यानंतरही त्यांनी माहिती न दिल्यामुळे पुन्हा दि.९.६.२००८ च्या पत्रान्वये श्री.कानडे यांना कळविले. त्यानंतर दि.२३.६.२००८ रोजी अपिलाची सुनावणी निश्चित केली. विलंबाबाबतचे कोणतेही समर्थनीय स्पष्टीकरण श्री.कानडे वरील विलंबाविषयी देऊ शकले नाहीत. विलंब झाल्यामुळे माहिती निःशुल्क देण्याचे आदेश आपण दिले. दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार अपिलीय प्राधिकारी म्हणून आपल्याला नसल्यामुळे आयोगाला तसा अहवाल सादर केला, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, ता.वाई, जि.सातारा श्री.यु.जी.पाटील यांनी केले. विलंबाबद्दल श्री.कानडे शास्तीस पात्र असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

श्री.केदारी(सुतार) यांनी माहिती मागणारे पाच अर्ज केले असून पाचही अर्जांबाबत एकच अपील केले आहे. तसेच त्यांनीही अपील करण्याची माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये असलेली मुदत पाळलेली नाही. जन माहिती अधिकारी श्री.कानडे यानी नमूद केलेल्या अडचणी लक्षात घेतल्या तरी विहित मुदतीत उत्तर देणे शक्य व आवश्यक होते. तसेच एकाही अर्जाला उत्तर न पाठविण्याची त्यांची कृती समर्थनीय ठरत नाही. अपीलकर्त्याच्या दि.२७.६.२००७ रोजीच्या अर्जावरील अपील मुदतबाह्य असून त्याची दखल घेतली जाणार नाही. ऊर्वरित चार अर्जांबाबतची माहिती देण्यास ८० दिवस विलंब झाला आहे. श्री.कानडे यांनी नमूद केलेल्या अडचणी व माहिती

देऊ केली असता अपीलकर्त्याने ती स्वीकारण्यास दि.३.७.२००८ रोजी नकार दिला. हे लक्षात घेता माहिती देण्यास झालेला विलंब ६७ दिवसांचा आहे. त्यातील एक महिन्याचा विलंब जन माहिती अधिकाऱ्यांच्या विनंतीचा विचार करून क्षमापित करण्यात येत आहे. ऊर्वरित ३७ दिवस विलंबासाठी ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, खंडाळा, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, ता.खंडाळा, जि.सातारा श्री.व्ही.जी.कानडे यांनी माहिती देण्यासाठी केलेल्या ३७ दिवस विलंबासाठी त्यांना (३७X२५०=९२५०) रु.९२५०/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, खंडाळा, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, ता.खंडाळा, जि.सातारा श्री.व्ही.जी.कानडे यांच्याकडून अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपविभागीय कृषी अधिकारी, ता.वाई, जि.सातारा यांनी जन माहिती अधिकारी यांच्या मे २०१० व जून २०१० या महिन्यात मिळणाऱ्या अनुक्रमे एप्रिल २०१० व मे २०१० च्या वेतनातून दोन हप्त्यात ही शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करून. त्याचा अहवाल आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि. ७ .४.२०१०**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरेश निवृत्ती निकाळजे
रा. हुलावळे वस्ती, हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक संचालक,
रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र,
४८१, रास्ता पेठ, पुणे-४११ ०११ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा रोजगार व स्वयंरोजगार
मार्गदर्शन अधिकारी, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. सुरेश निवृत्ती निकाळजे
रा. हुलावळे वस्ती, हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक संचालक,
रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र,
४८१, रास्ता पेठ, पुणे-४११ ०११ श्री. गं. अ. सांगडे

**जन माहिती अधिकारी** तथा रोजगार व स्वयंरोजगार
मार्गदर्शन अधिकारी, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, पुणे
श्री. अ. ए. निकाळजे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.१२.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१.२०१० |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.२.२०१० |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.२.२०१० |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, पुणे श्री. अ.ए.निकाळजे यांच्या सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानाची प्रत त्रयस्थ पक्षाची व सार्वजनिक हिताशी संबंध नसलेली व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८ व ११ खालील म्हणून स्वत: जन माहिती अधिकाऱ्यांनीच नाकारली. तसेच कोणत्या निकषावर त्यांची नेमणूक केली याची माहितीही दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता यांनी केली. अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे जन माहिती अधिकारी श्री. अ.ए.निकाळजे व अपिलीय प्राधिकारी श्री. गं.अ.सांगडे यांनी मान्य केले.

शासकीय सेवकाची कोणालाही उपलब्ध होणे आवश्यक असलेली सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानावरील माहिती गोपनीय मानता येणार नाही. नेमणुकीचे निकष आदी बाबी अन्वयार्थाच्या स्वरुपाच्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अशी मागणी 'माहिती' ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी, पुणे श्री. अ.ए.निकाळजे यांच्या सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानाची साक्षांकित प्रत अपीलकर्त्यास नि:शुल्क द्यावी.

**पुणे**
दि. 27 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय नरहर पोतदार
दत्तछाया नाईकवाडी प्लॉट, उपळाई रोड, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९५ / सोलापूर / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.५.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय नरहर पोतदार
दत्तछाया नाईकवाडी प्लॉट, उपळाई रोड,
बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.३२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.४.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.८.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.७.५.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

कै.विलासरावजी शिंदे विद्यालय, टेंभुर्णी येथील शिक्षक / शिक्षकेतर मान्यता आदींबाबतची सन २००४ ते २००७ या कालावधीतील माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.व्ही.व्ही.जगताप यांनी त्यांच्या कक्षेतील माहिती असतानाही त्यांनी कै.विलासरावजी शिंदे विद्यालय, टेंभुर्णीचे मुख्याध्यापक यांना माहिती देण्याबाबतच्या सूचना दिल्या. मुख्याध्यापकांनी माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी सुमारे ४६४ दिवसांनी माहिती दिली. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.के.सगरे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर यांनी १५ दिवसात माहिती देण्याचे दि.१८.६.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त नमूद केले होते. तथापि त्यानुसार माहिती दिली नाही. त्यानंतर दि.१०.५.२००९ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यानी रजिस्टर टपालाने माहिती पाठविली. संबंधित जन माहिती अधिका-यांवर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.दत्तात्रय नरहर पोतदार यांनी केली.

श्री.पोतदार यांचा दि.१४.३.२००७ चा अर्ज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.व्ही.व्ही.जगताप यांनी दि.२.४.२००७ रोजी मुख्याध्यापक, कै.विलासरावजी शिंदे विद्यालय, टेंभुर्णी यांच्याकडे हस्तांतरित केला. परंतु मुख्याध्यापकांनी माहिती दिली नाही. तत्कालीन व्यवस्थेनुसार संस्थेचे सचिव हे अपिलीय प्राधिकारी होते. श्री.पोतदार यांनी आपल्याकडे केलेल्या अपिलावर संस्था सचिवांकडे अपील करण्याबाबत दि.२२.५.२००७ रोजी पत्राने कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.के.सगरे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात म्हटले असून १५ दिवसांत माहिती देण्यात येईल, असे नमूद केले आहे. मात्र त्यानुसार माहिती दिलेली नाही.

आयोगापुढील सुनावणीचे पत्र प्राप्त न झाल्यामुळे सुनावणीला उपस्थित राहता आले नाही. मुख्याध्यापकांनी श्री.पोतदार यांना माहिती न दिल्यामुळे दि.१०.५.२००९ रोजी रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर यांनी दि.१०.५.२००९ च्या पत्रान्वये आयोगास माहितीच्या प्रतीसह अवगत केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता संबधित माहिती जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या कक्षेतील असून त्यांनी ती विहित मुदतीत द्यावयास हवी होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.व्ही.व्ही.जगताप यांनी हा अर्ज मुख्याध्यापकांकडे हस्तांतरित करणे आवश्यक नव्हते. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार पाच दिवसात हस्तांतरित करण्याची मुदत असताना त्यांनी दि.१४.३.२००७ चा अर्ज दि.२.४.२००७ रोजी म्हणजे १६ दिवसांनी हस्तांतरित केला. श्री.जगताप दि.१७.५.२००७ पर्यंत या पदावर होते. दि.१८.५.२००७ पासून श्री.एस.के.सगरे यांनी पदभार स्वीकारला. त्यांनीही विहित मुदतीत

तत्परतेने माहिती देण्याबाबत कार्यवाही केली नाही. दि.१८.७.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात १५ दिवसात माहिती देण्याचे नमूद करूनही दि.१०.५.२००९ पर्यंत त्यांनी पूर्तता केलेली नाही. या बाबी लक्षात घेता श्री.जगताप व श्री.सगरे शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.व्ही.व्ही.जगताप यांनी अपीलकर्ता श्री.दत्तात्रय नरहर पोतदार यांच्या दि.१४.३.२००७ च्या अर्जावर दि.१७.५.२००७ रोजी माहिती दिली असून तीस दिवसांची विहित मुदत वजा जाता ३४ दिवस विलंब झाला आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार त्यांना (३४दिवस X २५०रुपये प्रतिदिन=८५००) रूपये ८५०० इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

(३) जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.के.सगरे यांनी दि.१८.५.२००७ ते दि.१०.५.२००९ पर्यंत माहिती दिलेली नाही. त्यामुळे त्यांना रूपये २५००० शास्ती लावण्यात येत आहे.

(४) अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी जन माहिती अधिकारी श्री.व्ही.व्ही.जगताप व श्री.एस.के.सगरे यांच्या मे २०१०, जून २०१० व जुलै २०१० या महिन्यात मिळणाऱ्या अनुक्रमे एप्रिल २०१०, मे २०१० व जून २०१० च्या वेतनातून तीन हप्त्यात ही शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करून त्याचा अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.०९.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधाभवनासमोर, पुणे ४११ ००१

श्री.रशिद उस्मान शेख
आशियाना, प्लॉट नं. ७७,
कोतवले मळा,
सुंदर पार्कजवळ, जुना कुपवाड रोड,
सांगली
..... **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
**तहसीलदार,**
तहसील कार्यालय मिरज,
जिल्हा सांगली
..... **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
**निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय मिरज,
जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५३+५५९/ सांगली |
| २ | संदर्भ | राज्य माहिती आयोगाचे समक्रमांकाचे दि. १८/१२/२००९ रोजीचे आदेश. |

## सुधारित आदेश

श्री.रशिद उस्मान शेख यांच्या समक्रमांकाच्या दोन्ही अपिलावर राज्य माहिती आयोगाने पारित केलेल्या दि.१८/१२/२००९ च्या आदेशातील अनुक्रमांक २ मध्ये 'तत्कालीन अपिलीय

प्राधिकारी तथा तहसीलदार, मिरज श्रीमती वैशाली चव्हाण-जाधव यानी आयोगाच्या आदेशानुसार अहवाल सादर न केल्याबद्दल त्यांच्याविरुध्द जिल्हाधिकारी, सातारा यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये शिस्तभंगाची कारवाई करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करण्याबाबत' आदेशित केलेले होते.

'अपील क्र.५५३ मध्ये अपीलकर्त्याचे अपील माझ्या कार्यकालात कार्यवाहीसाठी आलेले नाही. तथापि अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांना यापूर्वीच देण्यात आलेली आहे. अपील क्र. ५५९ मध्ये अपीलकर्त्याच्या मूळ अर्जात मागितलेली माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मिरज तहसील कार्यालयास प्राप्त न झाल्याबाबद्दल संबंधितांना नोटिसा काढण्यात आलेल्या होत्या', असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मिरज श्रीमती वैशाली चव्हाण-जाधव यांनी लेखी निवेदनात नमूद केलेले आहे.

उपरोक्त निवेदन विचारात घेता आयोगाचा सुधारित आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१. अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्रीमती वैशाली चव्हाण-जाधव तथा तहसीलदार, तहसील कार्यालय मिरज, जिल्हा सांगली यांच्या विरुध्दचे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ नुसार कार्यवाही करण्याबद्दलचे दि. १८/१२/२००९ रोजीचे पूर्वीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**स्थळ : पुणे**
**दि.** 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. संग्राम तुकाराम पाटील
द्वारा ग्लोबल इन्फोसिंस लर्निंग,
शाहू मिल चौक, कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**१) अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
कागल, जि.कोल्हापूर

**२) अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
करवीर, जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७५७/२०१०/कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६/०६/२००९, १२/१०/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५/१०/२००९, १२/१०/२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११/०२/२०१० |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री. तुकाराम धोंडीराम पाटील यांना ज्या कागदपत्रांच्या आधारे उत्पन्नाचे दाखले देण्यात आले त्या कागदपत्रांच्या नकला | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. संग्राम तुकाराम पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती - मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 27 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अविनाश तात्यासाहेब शिंदे
पिताश्री कॉम्पलेक्स, वंटमुरे कॉर्नर, सांगली रोड,
मिरज ४१६ ४१० — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी**
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७७/ सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ |
| ३. | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी**<br>शिक्षण उपसंचालक कार्यालय,<br>कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री.डी.एम.पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी**<br>शिक्षण उपसंचालक कार्यालय,<br>कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री.एम.एस.नांगरे पाटील | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२४.०१.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

प्राथमिक अनुदानित शाळा आपल्या संस्थेकडून अन्य संस्थेकडे खोट्या कागदपत्रांच्या आधारे जन माहिती अधिकारी शिक्षण उपसंचालक कार्यालय,कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री.एम.एस.नांगरे पाटील यांनी वर्ग केली व आपल्या हरकतींचा विचार न करता शिक्षण उपसंचालकांनी त्याला मंजुरी दिली, म्हणून आपण मागितलेली माहिती जाणीवपूर्वक दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.अविनाश तात्यासाहेब शिंदे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात व लेखी निवेदनाद्वारे केले.

श्री.शिंदे यांनी सन २००३ पासूनची माहिती मागितलेली असून ती संदिग्ध स्वरुपाची आहे. संबंधित शाळा व प्रशासन अधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ, सांगली यांच्या स्तरावरील ही माहिती असल्यामुळे त्यांच्याकडून घेण्याबाबत कळविले. एकच माहिती वेगवेगळ्या ठिकाणी अर्ज करुन ते मागत आहेत. संबंधित शाळेने कळविलेले शुल्क त्यांनी भरले नाही. अन्य शाळेने त्यांना माहिती दिली आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीस ते उपस्थित नव्हते, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालय,कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री.एम.एस.नांगरे पाटील व अपिलीय प्राधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालय,कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री.डी.एम.पाटील यांनी केले.

जन माहिती अधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालय,कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री.एम.एस.नांगरे पाटील व अपिलीय प्राधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालय,कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री.डी.एम.पाटील यांनी योग्य कार्यवाही केली आहे. शााळेच्या हस्तांतरणाबाबतचे अपीलकर्त्याचे मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत निर्णयाचे नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य .

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 26 APR 2010

(शिक्का: राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.निजाम युसूफसाहेब मुलाणी
सी.२३२८, शनिवार पेठ, कोल्हापूर — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहायक आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापिका,
राजमाता जिजाबाई गर्ल्स हायस्कुल,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८२/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.०२.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री.निजाम युसूफसाहेब मुलाणी<br>सी.२३२८, शनिवार पेठ, कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** सहायक आयुक्त,<br>कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्रीमती शिल्पा नाईक<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापिका,<br>राजमाता जिजाबाई गर्ल्स हायस्कुल,<br>कोल्हापूर महानगरपालिका,<br>कोल्हापूर श्रीमती आनंदी रामचंद्र भोई | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.०९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१५.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२७.११.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

शाळेकडील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार फरकाची रक्कम अदा करण्याबाबत सन २००२ ते ऑगस्ट २००८ या काळातील माहिती आपण मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, राजमाता जिजाबाई गर्ल्स हायस्कूल, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्रीमती आनंदी रामचंद्र भोई यांनी ती दिली नाही. महानगरपालिकेकडील अनुदानाची रक्कम अनामतीत ठवेली जात नाही. ते जमा करावे लागते. या संदर्भात नियमानुसार योग्य कार्यवाही केलेली नाही, असे निवेदन अपीलकर्ता श्री.निजाम युसूफसाहेब मुलाणी यांनी केले.

श्री.मुलाणी यांनी मागितलेली उपलब्ध माहिती त्यांना त्वरित दिली. पाचव्या वेतन आयोगाच्या संदर्भातील त्यांनी मागितलेल्या माहितीची संचिका त्यावेळी उपलब्ध नव्हती. तिचा शोधा घेऊन ती प्राप्त झाल्यावर मूळ अर्जानुसार राहिलेली माहिती त्यांना देऊ केली असता त्यांनी स्वीकारण्यास नकार दिला. त्यामुळे टपालाने संपूर्ण संचिकेची छायाप्रत त्यांना पाठविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,राजमाता जिजाबाई गर्ल्स हायस्कूल, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्रीमती आनंदी रामचंद्र भोई यांनी पूरक कागदपत्रांसह केले. अपीलकर्ता श्री.निजाम युसूफसाहेब मुलाणी शाळेत आल्यास संबंधित सर्व संचिका त्यांना अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील, असेही त्यांना यापूर्वीच स्पष्ट करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री.मुलाणी हे महानगरपालिकेचे कर्मचारी असून शाळेकडे वर्ग करण्यात आले होते. पाचव्या वेतन आयोगानुसार फरकाची रक्कम मिळावी, ही त्यांची मुख्य मागणी असून त्याबाबत त्यांना वेळोवेळी कळविले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहायक आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्रीमती शिल्पा नाईक यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,राजमाता जिजाबाई गर्ल्स हायस्कूल, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्रीमती आनंदी रामचंद्र भोई व अपिलीय प्राधिकारी तथा सहायक आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्रीमती शिल्पा नाईक यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अनुदानाच्या रकमेबाबतची महानगरपालिकेची कार्यवाही योग्य की नियमबाह्य असे

अपीलकर्त्याने मांडलेले आक्षेपाचे मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत निर्णयाचे नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

स्थळ : पुणे
दि. 27 APR 2010

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.बापू पांडुरंग पोळ
मु.गोखळी, पो.बिजवडी,
ता.इंदापूर, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
पंचायत समिती इंदापूर,
ता.इंदापूर, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
पंचायत समिती इंदापूर,
ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९/०४/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३/०८/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३/१०/२००९ |
| ५ | **उपस्थिती**<br>श्री.बापू पांडुरंग पोळ<br>मु.गोखळी, पो.बिजवडी,<br>ता.इंदापूर, जि.पुणे<br><br>अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती इंदापूर,<br>श्री.किरण जाधव<br><br>जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,<br>पंचायत समिती इंदापूर,<br>श्री.जी.आर.इंगळे | |

| | |
|---|---|
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** पंचायत समिती इंदापूर मधील कर्मचा-यांचे हजेरीपत्रक, फिरतीचे रजिस्टर, किरकोळ व अर्जीत रजा रजिस्टरच्या छायाप्रती |

## विवेचन

'मला पंचायत समिती इंदापूर कार्यालयाकडून आवश्यक ती माहिती पाहण्यास उपलब्ध करुन देण्यात आली असल्याने माझे समाधान झालेले आहे. तरी माझे आयोगाकडील अपील निकाली काढण्यात यावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.बापू पांडुरंग पोळ यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 9 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.आनंदा पांडुरंग लोहार
मु.पो.पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, विठ्ठल विविध कार्यकारी
सहकारी सेवा सोसायटी, पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, विठ्ठल विविध कार्यकारी
सहकारी सेवा सोसायटी, पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आनंदा पांडुरंग लोहार
मु.पो.पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, विठ्ठल विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी, पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.एस.डी.कोळे(पाटील)

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, विठ्ठल विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी, पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.एस.डी.कोळे(पाटील)

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३०.९.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.१०.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१२.११.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | आदेश नाही |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१०.२.२०१० रोजी घेण्यात आली.

साखर कारखान्याकडील आपल्या बिलातून श्री विठ्ठल विकास सेवा सोसायटी, पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांनी रक्कम वळती करून घेतली. त्याबाबतची माहिती मागितली असता माहिती निरंक आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सचिव, विठ्ठल विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी, पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांनी कळविले. आता कारखाना या संस्थेला रक्कम दिली नसल्याचे म्हणत आहे. संबंधित सहीची व माहितीची शहानिशा व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.आनंदा पांडुरंग लोहार यांनी केली.

श्री.लोहार आमच्या संस्थेचे सभासद नाहीत व कारखान्याने ऊस बिल संस्थेकडे पाठविलेले नाही. हे त्यांना विहित मुदतीत कळविलेले आहे. तसेच कारखान्यानेही त्याबाबत स्पष्ट केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, विठ्ठल विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी, पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांचे प्रतिनिधी यांनी केले.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.आनंदा पांडुरंग लोहार
मु.पो.पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, विठ्ठल विविध कार्यकारी
सहकारी सेवा सोसायटी, पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, विठ्ठल विविध कार्यकारी
सहकारी सेवा सोसायटी, पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आनंदा पांडुरंग लोहार
मु.पो.पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, विठ्ठल विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी, पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.एस.डी.कोळे(पाटील)

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, विठ्ठल विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी, पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.एस.डी.कोळे(पाटील)

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३०.९.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.१०.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१२.११.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | आदेश नाही |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१०.२.२०१० रोजी घेण्यात आली.

साखर कारखान्याकडील आपल्या बिलातून श्री विठ्ठल विकास सेवा सोसायटी, पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांनी रक्कम वळती करून घेतली. त्याबाबतची माहिती मागितली असता माहिती निरंक आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सचिव, विठ्ठल विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी, पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांनी कळविले. आता कारखाना या संस्थेला रक्कम दिली नसल्याचे म्हणत आहे. संबंधित सहीची व माहितीची शहानिशा व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.आनंदा पांडुरंग लोहार यांनी केली.

श्री.लोहार आमच्या संस्थेचे सभासद नाहीत व कारखान्याने ऊस बिल संस्थेकडे पाठविलेले नाही. हे त्यांना विहित मुदतीत कळविलेले आहे. तसेच कारखान्यानेही त्याबाबत स्पष्ट केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, विठ्ठल विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी, पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांचे प्रतिनिधी यांनी केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पूरक कागदपत्रांसह अपीलकर्त्यास उत्तर दिले आहे. सद्याची सत्यासत्यता व कार्यवाहीची वैधता हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. नारायण शेषाद्री कुलकर्णी
विश्वकमल, फ्लॅट नं.३, पहिला मजला,
आबासाहेब रायकर नगरच्या समोरील गारमाळ,
धायरी, पुणे-४११ ०४१

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),
उस्मानाबाद यांचे कार्यालय, उस्मानाबाद उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, तुळजापूर
तहसील कार्यालय, तुळजापूर, जि. उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६१६ / २००९/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १६.२.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. नारायण शेषाद्री कुलकर्णी<br>विश्वकमल, फ्लॅट नं.३, पहिला मजला,<br>आबासाहेब रायकर नगरच्या समोरील गारमाळ,<br>धायरी, पुणे-४११ ०४१ | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.११.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ)ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्यानंतर सुमारे एक महिन्याने म्हणजे मूळ अर्ज केल्यापासून एक वर्षानंतर मिळाली. अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर यांनी माहिती मुदतीत दिली नाही. त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. नारायण शेषाद्री कुलकर्णी यांनी केली.

श्री. कुलकर्णी यांनी मागितलेली माहिती सन १९६४.६५ ते १९८४.८५ या कालावधीतील आहे. संबंधित संचिका शोधूनही उपलब्ध झाली नाही, असे त्यांना विहित मुदतीत कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद यांच्या आदेशानंतर शोध घेऊनही संचिका उपलब्ध झाली नाही. तहसील कार्यालयाच्या इमारतीचे स्थलांतर झाल्यामुळे अभिलेखाच्या शोधातही अडचणी येत होत्या. तथापि सातत्याने शोध घेतल्यानंतर संचिका उपलब्ध झाली व श्री. कुलकर्णी यांनी मागितलेली माहिती दि. ३१.८.२००९ रोजी साक्षांकित प्रतीच्या स्वरुपात रजिस्टर्ड टपालाने पाठविली, असे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर यांनी लेखी निवेदनाद्वारे आयोगास कळविले. हे निवेदन लक्षात घेता अपीलकर्त्याची दंडात्मक कारवाईची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 29 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनासमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश गोपीनाथ बुचडे ..... **अपीलकर्ता**
ग नं ७६, मु पो व ता पलूस,
जिल्हा सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक, ..... **उत्तरवादी**
भूमी अभिलेख, सांगली

**जा माहिती अधिकारी तथा** तालुका निरिक्षक,
भूमी अभिलेख तासगाव, जि सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६३६/ सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | १९/३/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | १६/०४/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | २५/०४/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | ०७/०६/२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** १९७६ साली गट नं ५६३ मधिल क्षेत्र ११५ आर होते ते १०१ आर कसे झाले, याबाबतचा खुलासा | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि ११/११/२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त या अपिलाचा समावेश होता.

जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, तासगाव यांनी अपीलकर्ता श्री सुरेश गोपीनाथ बुचडे यांना दि. १६/४/२००८ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिली असल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे अपीलकर्त्याची मूळ मागणी ही क्षेत्र दुरुस्ती असून सदरची बाब ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. २१-०४-२०१०.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विठ्ठल लक्ष्मण चिगरी
रा.घर नं.३९५/२,शिवाजी गल्ली,
एस.टी.कॉलनी, चंदगड,
ता.चंदगड, जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर,
जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप विभागीय अधिकारी, गडहिंग्लज विभाग,
गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.०२.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी तथा** उप विभागीय अधिकारी, गडहिंग्लज विभाग, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्रीमती निलिमा धायगुडे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.०९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०३.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०७.०१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२७.०२.२००९ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.विठ्ठल लक्ष्मण चिगरी यांनी कोळी-महादेव या अनुसूचित जमातीच्या जात - प्रमाणपत्राच्या संदर्भात विशिष्ट नमुन्यात व विस्तृत माहिती मागितली होती. सन १९५० पासूनची

माहिती त्यांनी मागितली असून त्यातील आपल्या कार्यालयाकडील माहिती त्यांना दिली. पुराभिलेख विभाग;मुंबई, तहसीलदार;चंदगड, जिल्हा सांख्यिकी अधिकारी;कोल्हापूर, गट विकास अधिकारी;चंदगड, आजरा, गडहिंग्लज या अन्य कार्यालयांकडील माहितीबाबत त्या त्या कार्यालयांना पत्र पाठवून तसे अपीलकर्त्यास कळविले, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, गडहिंग्लज विभाग, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्रीमती निलिमा धायगुडे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. केवळ त्रास देण्याच्या हेतूने अपीलकर्ता या संदर्भात वेळोवेळी विविध स्वरुपाचे अर्ज करीत आहेत. त्यांना स्वत:ला कोळी-महादेव अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र नाकारण्यात आल्यामुळे ते अशा प्रकारचा पत्रव्यवहार व आरोप करीत आहेत, असेही श्रीमती धायगुडे यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पहाता अपीलकर्त्याने अत्यंत विस्तृत स्वरुपातील व संकलनासाठी साधनसामुग्री प्रमाणाबहेर वळवावी लागेल अशा स्वरुपाची माहितीची मागणी केलेली आहे. त्याबाबत जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, गडहिंग्लज विभाग, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्रीमती निलिमा धायगुडे यांनी केलेली कार्यवाही व अपिलीय प्राधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी कोल्हापूर श्री.तुकाराम कासार यांनी दिलेला निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 27 APR 2010